प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

ऑक्टोबर 5, 2018

**दि नवनिर्माण को-ऑपरेटिव अर्बन बँक लि., हैद्राबाद, तेलंगणा हयांचेवर आरबीआयकडून आर्थिक दंड लागु**

भारतीय बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46(4) सह वाचित कलम 47अ(1)(क) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, दि नवनिर्माण को-ऑपरेटिव अर्बन बँक लि., हैद्राबाद, तेलंगणा हयांना, 'एक्सपोझर नॉर्म्स आणि वैधानिक/इतर निर्बंध युसीबीज' हयावर रिझर्व बँकेने दिलेले निर्देश/सूचना/मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन केले असल्याने रु.50,000/- (रुपये पन्नास हजार) दंड लागु केला आहे.

भारतीय रिझर्व बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर वरील बँकेने लेखी उत्तर सादर केले होते. ह्या प्रकरणातील सत्य, बँकेने दिलेले उत्तर व वैय्यक्तिक सुनावणी विचारात घेऊन रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की उल्लंघने झाल्याचे सिध्द होत असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/798**